जनसंपर्क कक्ष

22 JAN 2023 Sunday Times शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# River pollution can be controlled with proper steps: Water expert

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** River pollution and flooding are caused by many natural and man-made causes, but if proper steps are taken, pollution can be brought under control within one to three years, said senior water expert Dr Rajendrasinh Rana.

He was addressing a session titled 'Panchaganga — Floods and Pollution' organized jointly by the department of technology, Shivaji University Kolhapur (SUK) and the Association of Architects and Engineers at Rajarshi Shahu Auditorium of SUK.

Rana said, "As per our tradition, we consider a river our mother. However, after we started thinking of earning money from this mother selfishly, we become the cause of her exploitation. A river has absolute authority over its territory, but we don't accept it. The river flows with its purity, that is why we call it a river. As much as the right to life and freedom is granted to us by the Constitution, we should also accept the freedom of the river to flow freely."



TOI

Water expert Dr Rajendrasinh Rana (in brown jacket) addressed a session titled 'Panchaganga – Floods and Pollution' at the SUK

He further said that the Maharashtra government's 'Let's Get to Know the River' initiative has received a good response. Initially, 75 rivers were listed under this initiative, but later the number went up to 108. From there, reality came to the fore that many rivers in the state are in dire condition. Panchaganga river is one of them.

"Earlier, a hundred years ago, the saints and monks took the responsibility of not letting the rivers get polluted, but now the education field needs to take initiative and work for it. Efforts have to be made from the very first drop of rain to prevent floods. It is time-consuming, but we can prevent pollution by curbing some of our bad habits," added Rana.

Meanwhile, on this occasion, an MoU was signed between SUK and the Association of Architects and Engineers. The purpose of this agreement is to create manpower, knowledge and technology required for industries, provide industrial training to students and disseminate knowledge by organizing various conferences, workshops etc.

22 JAN 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

त्रिस्तरीय समिती स्थापन : आर्किटेक्ट्स असोसिएशनसोबत सामंजस्य करार

# प्रदूषण नियंत्रित केल्यास महापुराची समस्या सुटेल : राजेंद्रसिंह राणा


लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी सर्वांच्या समन्वयाने कृती आराखडा तयार करावा. या प्रक्रियेला तीन वर्षांहून अधिक काळ लागणार नाही. प्रदूषण नियंत्रित केल्यास महापुराची समस्या सुटू शकेल, असे मत जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी शनिवारी व्यक्त केले. पूरस्थितीचा अभ्यास करून प्रदूषण रोखण्यासाठी विद्यापीठाच्या माध्यमातून युध्दपातळीवर काम करावे, असे आवाहनही डॉ. राणा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स अँड इंजिनीअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्य सभागृहात झालेल्या 'पंचगंगा- पूर आणि प्रदूषण' या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. राणा म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने गेल्या काही वर्षात पंचगंगा नदी आणि प्रदूषण याविषयी जे अभ्यास, शोधनिबंध, प्रबंध कपाटात बंद झाले आहेत ते बाहेर काढावे, त्याचा अभ्यास करावा आणि त्याचे विश्लेषण करावे.

ते म्हणाले, नदी जाणूया या उपक्रमात १०८ नद्यांचा सहभाग आहे. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा, कृष्णा आणि कडवीचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कालबध्द कार्यक्रम राबवून नदी प्रदूषण लवकर आटोक्यात आणू शकतो. विद्यापीठ या प्रश्नासाठी सारथी बनेल. विद्यार्थी, अभ्यास मंडळ आणि पर्यावरण अभ्यासकांनी याच विषयावर कृती आराखडा तयार करावा.



शिवाजी विद्यापीठात शनिवारी झालेल्या चर्चासत्रात डॉ. राजेंद्र सिंह राणा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी राज डोंगळे, अजय कोराणे, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस. एन. सपली उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

यावेळी मंचावर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आर्किटेक्ट असोसिएशनचे सचिव राज डोंगळे उपस्थित होते. असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी प्रास्ताविक केले. तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी आभार मानले.

### त्रिस्तरीय समिती

या कार्यक्रमात 'पंचगंगा-पूर आणि प्रदूषण' या संदर्भात डॉ. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठाची त्रिस्तरीय समिती जाहीर केली. त्यात डॉ. आसावरी जाधव (संशोधन संकलन), पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख, डॉ. पी. डी.पाटील (सामग्री विश्लेषण), तंत्रज्ञान अधिविभाग आणि डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. प्रकाश राऊत (निष्कर्ष समिती) यांचा समावेश आहे.

## सामंजस्य करारावर स्वाक्षरी

'चला जाणू या नदीला' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट अँड इंजिनिअरिंग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी यावर स्वाक्षरी केली. साक्षीदार म्हणून डॉ. राणा यांनी स्वाक्षरी केली. शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स अँड इंजिनिअर्स यांच्यामध्ये उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ, ज्ञान आणि तंत्रज्ञान निर्मिती करणे, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण देणे आणि विविध परिषदा, आदींच्या आयोजनातून ज्ञानप्रसार करणे यासाठी हा करार केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JAN 2023
सकाळ

# डॉ. राजेंद्रसिंह राणा; शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घेण्याचे आवाहन

# जल, पर्यावरणाबाबतचे संशोधन खुले करा

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : 'जल आणि पर्यावरण संवर्धनाबाबत आतापर्यंत झालेले अधिकतर संशोधन कपाटबंद आहे. सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेतून विद्यापीठांनी ते खुले करावे. या संशोधनाची छाननी, निष्कर्ष जाणून घेण्यासाठी स्वतंत्र समित्यांची नियुक्ती करावी. त्याची सुरुवात शिवाजी विद्यापीठाने करावी. संशोधनाचे निष्कर्ष लक्षात घेऊन पर्यावरण अभ्यासक, तज्ज्ञ, नागरिक आणि प्रशासनाने एकत्रितपणे काम करावे', असे आवाहन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पर्यावरण व जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स अँड इंजिनिअर्स यांच्यातर्फे आयोजित 'पंचगंगा- पूर आणि प्रदूषण' या विषयावर राजर्षी शाहू सभागृहात त्यांचे व्याख्यान झाले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. राणा म्हणाले, की 'चला, नदीला जाणून घेऊ या' उपक्रमातून राज्यातील अनेक नद्या अत्यवस्थ असल्याचे वास्तव सामोरे आले. पंचगंगा त्यापैकी एक आहे. १०० वर्षांपूर्वीपर्यंत नद्या प्रदूषित न होऊ देण्याची जबाबदारी साधू-संतांनी घेतली होती. आता मात्र विद्येच्या क्षेत्राने त्यासाठी पुढाकार घ्यावा. नद्यांना पूर येण्यामागे अनेक नैसर्गिक व कृत्रिम कारणे आहेत. तो नियंत्रित आणण्याच्या प्रक्रियेला वेळ लागेल. मात्र, प्रदूषणाच्या अनुषंगाने विविध कृती कार्यक्रम राबवून ते एक ते तीन वर्षांत निश्चितपणाने आटोक्यात आणता येते.

संशोधक विद्यार्थ्यांनी सामाजिक, पर्यावरणीय प्रश्न घेऊन तदअनुषंगिक प्रकल्प हाती घ्यावेत, असे आवाहन डॉ. शिर्के यांनी या वेळी केले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आर्किटेक्ट असोसिएशनचे सचिव राज डोंगळे उपस्थित होते. असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी प्रास्ताविक केले. तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शनिवारी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पर्यावरण व जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे व्याख्यान झाले. या वेळी राज डोंगळे, अजय कोराणे, दिगंबर शिर्के, प्रमोद पाटील, विलास शिंदे, एस. एन. सपली उपस्थित होते.

## आर्किटेक्टस असोसिएशनचा सामंजस्य करार

■ विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स यांच्यात सामंजस्य करार झाला. उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ, ज्ञान आणि तंत्रज्ञान निर्मिती करणे, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण देणे असा या कराराचा हेतू आहे. या करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. शिंदे, असोसिएशनतर्फे कोराणे, तर साक्षीदार म्हणून डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी स्वाक्षरी केली.

## विद्यापीठाची त्रिस्तरीय समिती

■ डॉ. राणा यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेनुसार त्रिस्तरीय समितींच्या अनुषंगाने कुलगुरू डॉ. शिर्के यांनी संशोधन संकलनासाठी पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, सामग्री विश्लेषणासाठी तंत्रज्ञान अधिविभागातील डॉ. पी. डी. पाटील आणि निष्कर्ष समितीत डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. सचिन पन्हाळकर आणि डॉ. प्रकाश राऊत यांची नावे जाहीर केली.

22 JAN 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...तर तीन वर्षांत पंचगंगा नदीचे प्रदूषण थांबेल

## जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा; विद्यापीठात विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नद्यांना पूर येण्यामागे अनेक नैसर्गिक व कृत्रिम कारणे आहेत. तो नियंत्रित आणण्याच्या प्रक्रियेला वेळ लागेल. परंतु प्रदूषण रोखण्यासाठी नियोजनबद्ध कृती कार्यक्रम राबविल्यास निश्चितपणाने तीन वर्षांत पंचगंगा नदीचे प्रदूषण आटोक्यात आणता येईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग, असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स अँड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'पंचगंगा - पूर आणि प्रदूषण' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. डॉ. राजेंद्रसिंह म्हणाले, १९३२ ला ब्रिटिश अधिकारी हॉकिन्सने बनारससाठी लागू केलेल्या आदेशाने नदीचे स्वातंत्र्य हिसकावून घेतले. संविधानाने आपल्याला जगण्याचा, स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान केला आहे. त्याप्रमाणेच नदीचे प्रवाहीपणे वाहण्याचे स्वातंत्र्य मान्य करायला हवे. 'चला, नदीला जाणून घेऊया' या उपक्रमात सुरुवातीला ७५ नद्या होत्या. ही संख्या



१०८ पर्यंत गेली. त्यातून राज्यातील अनेक नद्या अत्यवस्थ असल्याचे वास्तव सामोरे आले. पंचगंगा त्यापैकी एक आहे. शंभर वर्षांपूर्वीपर्यंत नद्या प्रदूषित न होऊ देण्याची जबाबदारी साधुसंतांनी पार पाडली. आता मात्र शिक्षण क्षेत्राने त्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. डॉ. शिर्के म्हणाले, प्रदूषण हे मानवनिर्मित असल्याने ते रोखणे शक्य आहे. संशोधक विद्यार्थ्यांनीही सामाजिक व पर्यावरणीय प्रश्न घेऊन प्रकल्प हाती घ्यावेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आर्किटेक्ट असोसिएशनचे सचिव राज डोंगळे उपस्थित होते. असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी प्रास्ताविक केले. तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी आभार मानले.

**सामंजस्य कराराचे जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह बनले साक्षीदार**

शिवाजी विद्यापीठ व असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स अँड इंजिनिअर्स यांच्यात सामंजस्य करार झाला. करारावर कुलसचिव डॉ. शिंदे यांनी तर संघटनेतर्फे अजय कोराणे यांनी स्वाक्षरी केल्या. करारावर साक्षीदार म्हणून डॉ. राणा यांनी स्वाक्षरी केली. याचा संदर्भ देऊन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी डॉ. राणा यांना पुढील विद्यापीठ भेटीवेळी कराराचे फलित विचारणार आहेत. त्या अनुषंगाने उद्यापासूनच त्या दृष्टीने कामाला सुरुवात करावी, असे सूचित केले.

### नदी प्रदूषण रोखण्यासाठी त्रिस्तरीय समिती

नदी प्रदूषण रोखण्यासाठी त्रिस्तरीय समितींच्या अनुषंगाने कुलगुरू डॉ. शिर्के यांनी कमिटी स्थापन केली. यात संशोधन संकलनासाठी पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव, सामग्री विश्लेषणासाठी तंत्रज्ञान अधिविभागातील डॉ. पी. डी. पाटील व निष्कर्ष समितीमध्ये डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. सचिन पन्हाळकर आणि डॉ. प्रकाश राऊत यांची नावे जाहीर केली.

22 JAN 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाराष्ट्रातील नद्या आयसीयुमध्ये

## जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठमध्ये व्याखानाचे आयोजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाराष्ट्रातील नद्या आयसीयुमध्ये आहेत. या नद्यांवर वेळीच उपचार केले नाहीत तर त्या मृत होतील. नद्या वाचवण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील सिनेट हॉलमध्ये शनिवारी शिवाजी विद्यापीठचा अधिविभाग आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स् अँड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. 'पंचगंगा पूर आणि प्रदूषण" असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. राजेंद्रसिंह म्हणाले, शंभर वर्षांपूर्वी नद्यांचे प्रदूषण होत होते. त्यावेळी नदीकाठी मंदिरे होती. तेथे साधूसंत होते. प्रदूषण करणाऱ्यांना ते दंड करत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह राणा. मंचावर डावीकडून राज डोंगळे, अजय कोराणे, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस. एन सपली

यामुळे नद्या स्वच्छ राहत होत्या. आज मात्र नद्या आयसीयुमध्ये असून वेळीच उपचार होण्याची गरज आहे. अन्यथा त्या मृत होतील.

नद्यांचे प्रदूषण थांबवण्याची जबाबदारी आता विद्यापीठांची आहे. कोणती नदी कोठे प्रदूषित होते हे विद्यापीठे सांगतील. विद्यापीठाने कृती आराखडा तयार करावा. पुढील कामासाठी शासनाकडे आपण पाठपुरावा करु. 'चला जाणूया नदीला" हा उपक्रम असून यात विद्यापीठे जोडल्यास काम अधिक चांगले होईल. नैसर्गिक प्रक्रिया, नाले अडवणे आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारुन प्रदूषित थांबवता येणे शक्य आहे, असे डॉ. राणा यांनी सांगितले.

दरवर्षी पावसाळ्यात महापूराचे संकट निर्माण होत आहे. पावसाळ्यात नदीत मोठ्या प्राण्याचा प्रवाह येतो. या प्रवाहाबरोबर मातीही वाहून येते. ही माती नदीच्या तळाशी साचून गाळ निर्माण होऊन नद्या उथळ होतात. यामुळे महापुराचे संकट येते. यासाठी नदीत वाहून येणाऱ्या मातीचा अभ्यास करुन ती थांबवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. हे काम दीर्घकालीन आहे, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यापीठाचे विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, प्रशासन या घटकांनी नदी प्रदूषणमुक्तीमध्ये सहभाग घेऊन योगदान द्यावे. अभ्यास मंडळांनी एखाद्या वर्षामध्ये सर्व सेमिनार आणि प्रकल्प नदी प्रदूषणाच्या एकाच विषयावर सादर केल्यास काम अधिक सोपे होईल. प्रदूषण आणि पूर ही दोन टोके असून प्रदूषण थांबवणे माणसाच्या हातात आहे. प्रदूषण थांबल्यास ३६५ दिवसापैकी किमान ३०० दिवस स्वच्छ पाणी मिळेल. माध्यम म्हणून यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा पुढाकार असेल.

यावेळी शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ, आर्किटेक्ट्स् अँड इंजिनिअर्स या दोन्ही संस्थांत सामंजस्य करार झाला. यावेळी मंचावर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आर्किटेक्ट ऑफ असोसिएशनचे सचिव राज डोंगळे उपस्थित होते. असोसिशनचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. आभार डॉ. एस. एन. सपली यांनी मानले.

### राणा यांनी महापूर व प्रदूषणावर सांगितलेले उपाय...

- पूर्वी नदीकाठी साधूसंतप्रदूषण करणाऱ्यांना दंड करत
- प्रदूषण थांबवण्याची जबाबदारी आता विद्यापीठांची
- सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अधिक उभारुन प्रदूषित थांबवणे शक्य
- नदीत वाहून येणारी माती थांबविल्यास महापूर थांबेल

### संशोधन संकलनासाठी नावे जाहीर

यावेळी त्रिस्तरीय समितींच्या अनुषंगाने कुलगुरू डॉ. शिर्के यांनी संशोधन संकलनासाठी पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव, सामग्री विश्लेषणासाठी तंत्रज्ञान अधिविभागातील डॉ. पी. डी. पाटील आणि निष्कर्ष समितीमध्ये डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. सचिन पन्हाळकर आणि डॉ. प्रकाश राऊत यांची नावे जाहीर केली.

22 JAN 2023

पुण्यनगरी

# पंचगंगेचे प्रदूषण निश्चितपणे आटोक्यात आणणे शक्य

## जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह : विद्यापीठात 'पंचगंगा पूर आणि प्रदूषण' या विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नद्यांना पूर येण्यामागे अनेक नैसर्गिक व कृत्रिम कारणे आहेत. तो नियंत्रित आणण्याच्या प्रक्रियेला वेळ लागेल. तथापि, प्रदूषणाच्या अनुषंगाने विविध कृती कार्यक्रम राबवून ते एक ते तीन वर्षांत निश्चितपणाने आटोक्यात आणता येते, असे प्रतिपादन जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स् अँड इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पंचगंगा पूर आणि प्रदूषण' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. राजेंद्रसिंह म्हणाले, नदीला आई मानण्याची आपली परंपरा आहे; मात्र आपण जेव्हा या आईपासून कमाईचा स्वार्थी विचार करू लागलो, तेव्हापासून आपण तिच्या शोषणाला कारण झालेलो आहोत. नदीचा तिच्या क्षेत्रावर पूर्ण अधिकार असतो. राज्यातील अनेक नद्या अत्यवस्थ असल्याचे वास्तव सामोरे आले. पंचगंगा त्यापैकी एक आहे. शंभर वर्षांपूर्वीपर्यंत नद्या प्रदूषित न होऊ देण्याची जबाबदारी सज्जन साधुसंतांनी घेतली होती. आता मात्र विद्येच्या क्षेत्राने त्यासाठी पुढाकार घेऊन काम करण्याची गरज आहे. महापूर रोखण्यासाठी पावसाच्या पहिल्या थेंबापासून प्रयत्न करावे लागतील.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, प्रदूषण हे मानवनिर्मित असल्याने ते रोखणे शक्य आहे. त्यादृष्टीने तीन टप्प्यांवर काम करता येईल. पहिला म्हणजे विद्यापीठातील संशोधन व अभ्यास यांची नोंद करणे, दुसऱ्या टप्प्यात त्या सामग्रीचे विश्लेषण करणे आणि तिसरा टप्पा हा निष्कर्षाचा असेल.

यावेळी मंचावर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आर्किटेक्ट असोसिएशनचे सचिव राज डोंगळे उपस्थित होते. असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. एन. सपली यांनी आभार मानले.

### सामंजस्य कराराचे डॉ. राजेंद्रसिंह साक्षीदार

यावेळी शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट्स अँड इंजिनिअर्स यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ, ज्ञान आणि तंत्रज्ञान निर्मिती करणे, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण देणे आणि विविध परिषदा, कार्यशाळा आदींच्या आयोजनातून ज्ञानप्रसार करणे असा या कराराचा हेतू आहे. या करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. शिंदे यांनी तर संघटनेतर्फे कोराणे यांनी स्वाक्षरी केल्या. करारावर साक्षीदार म्हणून डॉ. राजेंद्र सिंह यांनी स्वाक्षरी केली.

# शिवाजी विद्यापीठात आजपासून कुस्ती दंगल

## देशभरातील विविध विद्यापीठांतील ८०० मल्ल दाखल, तयारी पूर्ण

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठात उद्या (ता. २२) पासून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा सुरू होणार आहे. त्याद्वारे कुस्ती दंगल रंगणार आहे. स्पर्धेत सुमारे १२०० विद्यार्थी मल्ल सहभागी होणार असून त्यापैकी ८०० मल्ल शनिवारी सायंकाळीपर्यंत दाखल झाले. विद्यापीठाकडून स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्ष आणि विद्यापीठाच्या हीरक महोत्सवीवर्षानिमित्त स्पर्धा आयोजित केली आहे.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रविवारपासून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा होत आहे. विद्यापीठाकडून स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात कुस्तीसाठीची चार मॅट सज्ज आहेत. प्रेक्षागॅलरीसह आवश्यक त्या सर्व सुविधांची उभारणी पूर्ण झाली आहे. देशभरातील विविध विद्यापीठांचे संघ शनिवारी सकाळपासून दाखल होण्यास सुरुवात झाली. दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, जम्मू-काश्मीर आदी विद्यापीठांतील मल्ल दाखल झाले. त्यापैकी काहींनी या मॅटवर सरावही केला. उद्या सकाळी सहापासूनच कुस्तीपटूंची नोंदणी, वजन, दस्तावेज पडताळणी आदींची सुरुवात होईल. सकाळी आठपासून फ्री स्टाईल गटातील विविध वजनी गटांतील स्पर्धांना सुरुवात होणार आहे.

### कुस्तीवर 'डीएसआर'ची नजर

स्पर्धेतील प्रत्येक कुस्तीचा निकाल अचूक लागणार आहे. त्यासाठी लढतीचे व्हिडिओ शूटिंग केले जाईल. त्यासह कुस्तीवर 'डीएसआर' सिस्टीमची नजर राहणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
22 JAN 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात रविवार २२ रोजीपासून सुरु होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी अत्याधुनिक अशी चार मॅट मैदाने तयार केली आहे.

# शिवाजी विद्यापीठात मल्लांचा शड्डू घुमणार

- अ. भा. आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेला आजपासून प्रारंभ
- सकाळी ८ नंतर फ्रिस्टाईल प्रकारातील कुस्तींना प्रारंभ, देशातील

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात ग्रीकोरोमन व फ्रिस्टाईल या कुस्ती प्रकारात प्रथमच आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेला रविवार २२ पासून सुरुवात होत आहे. सकाळी आठ वाजता फ्रीस्टाईल प्रकारातील कुस्तींना सुरुवात होइल. विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात अत्याधुनिक अशी चार मॅट मैदाने तयार आहे. सकाळी सहापासूनच सर्व मल्लांची नावे नोंदणी करुन वजने व कागदपत्रांचीही पडताळणी केली जाईल. शनिवारी सकाळी ११ वाजल्यापासून विविध विद्यापीठांच्या मल्लांचे संघ शिवाजी विद्यापीठात दाखल होऊ लागले होते. सर्वांची हॉस्टेलमध्ये सोय केली. अनेक मल्लांनी मॅटवर कुस्तीचा सरावही केला. या स्पर्धेचे सोमवार २३ रोजी सायंकाळी उद्घाटन होणार आहे. त्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून श्रीमंत शाहू छत्रपती हे आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JAN 2023 पुढारी

# आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धांना आजपासून प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात रविवार (दि.२२) पासून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाकडून तयारी पूर्ण झाली आहे.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात कुस्तीसाठी चार मॅट मैदाने तयार केली आहे. प्रेक्षागॅलरीसह आवश्यक सर्व सुविधांची उभारणी पूर्ण झाली आहे. देशभरातील विविध विद्यापीठांचे संघ स्पर्धेसाठी दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. काही संघांतील खेळाडूंनी मॅटवर सराव सुरू केला आहे. रविवारी सकाळी सहा वाजल्यापासूनच कुस्तीपटूंची नोंदणी, वजन, दस्तावेज पडताळणी आदी बाबींना प्रारंभ होईल. त्यानंतर आठ वाजल्यापासून फ्री-स्टाईल गटातील विविध वजनी गटांतील स्पर्धांना सुरुवात होणार आहे.

महासत्ता




शरीरसौष्ठव स्पर्धेप्रसंगी घेतलेले छायाचित्र.

# शरीरसौष्ठव स्पर्धेत अर्जुन मोंगले यास सुवर्णपदक

हातकणंगले, ता.२०(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत झालेल्या शरीरसौष्ठव स्पर्धेत हातकणंगलेच्या अर्जुन मोंगले याने प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक मिळवले. गेल्या वर्षी झालेल्या जुनिअर महाराष्ट्र श्री-२०२२ मध्येही सुवर्णपदक पटकावले होते. दरम्यानच्या काळात ही लहान मोठ्या शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये उत्तम यश मिळवलेआहे.

अर्जुन मोंगले हा सर्वसामान्य कुटूंबातील असून आण्णासाहेब डांगे महाविद्यालयामध्ये बी.कॉमचे शिक्षण घेत आहे. घरची परिस्थिती बेताची असलेने उदरनिर्वाहसाठी पान टपरीचा व्यवसाय करतो. शरीर सौष्ठवची आवड लहानपणापासूनच असल्याने बाबुजमाल तालीम मंडळ येथे सराव करत असे. इचलकरंजीच्या एन.एस.जिमचे मालक नागेश सुतार यांच्या मार्गदर्शनामुळे त्याला हे यश मिळवणे शक्य झाले. या यशामध्ये माजी उपनगराध्यक्ष रणजीत धनगर, महाविद्यालयाचे रमेश पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांची दक्षिण कोरिया येथे पीएचडीसाठी निवड

कोल्हापूर, ता. २०(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील दोन विद्यार्थी सौरभ थोरवत (रा. मौजे कासारवाडा, राधानगरी) व प्रिती शिंदे (रा. अचकनहळ्ळी, जत) यांची दक्षिण कोरिया येथील क्युंग ही व संक्युकवान युनिव्हर्सिटी येथे अप्लाइड फिजिक्स व केमिकल इंजिनिअरिंग या विषयामध्ये पीएचडीसाठी निवड झाली आहे. त्यांना अधिविभागातील रसायनशास्त्राचे प्रा. डॉ. सुशिलकुमार जाधव यांचे मार्गदर्शन मिळाले.

या दोघांनी २०१७ ते २०२२या कालावधीमध्ये बीएससी -एमएससी नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (पाच वर्षाचा एकात्मिक) अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. डॉ. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एमएससी पर्यंत तीन शोधनिबंध वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध केले आहेत. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ विलास शिंदे, प्रभारी संचालक डॉ. किरण कुमार शर्मा आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

पुण्यनगरी

# ‘कॉमर्स’च्या विद्यार्थ्यांची परेडसाठी निवड




प्रार्थना सातपुते



प्रथमेश पाटील

**कोल्हापूर :** देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समधील विद्यार्थी एसयूओ प्रार्थना सातपुते व जेयुओ प्रथमेश पाटील यांची २६ जानेवारी रोजी दिल्लीत कर्तव्य पथावर होणाऱ्या ७४ व्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी (आरडी परेड) निवड झाली. ते महाविद्यालयातील बीकॉम व बीबीए विभागात शिक्षण घेत आहेत. त्यांना कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, सदस्य ॲड. वैभव पेडणेकर व ॲड. अमित बाडकर तसेच प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच ५ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल मंजूनाथ हेगडे, लेफ्टनंट कर्नल विकास पोवार, सुभेदार मेजर हरिशचंद्र शिंदे, ट्रेनिंग प्रशांत जामानिक, सुभेदार शिवानंद नांगरे, महाविद्यालयाचे एएनओ लेफ्ट. डॉ. आर. एस. नाईक यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी




कोल्हापूर : प्राचार्य डॉ. शानेदिवाण यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

# प्राचार्य शानेदिवाण यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर :** श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी अनुवादित केलेल्या 'महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यांकन' या पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, माजी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. मधुकर बाचूळकर, निसर्ग अंकुर संस्थेचे प्रमुख मिलिंद धोंड यांच्या हस्ते झाले. श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेंअरमन मानसिंग बोंद्रे यांचे ह्या उपक्रमास प्रोत्साहन मिळाले. महाविद्यालयाचे प्रबंधक रवींद्र भोसले, अधीक्षक मनीष भोसले आदी उपस्थित होते.

लोकमत

# बीए डिफेन्स स्टडीचा निकाल केला जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील बीए डिफेन्स स्टडीच्या तिसऱ्या आणि चौथ्या सेमिस्टरसाठी घेण्यात आलेल्या परीक्षांचे निकाल शनिवारी घोषित झाले.

विद्यापीठातील पदवी, तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा शनिवारी वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या.

बीए, बीकॉम, बीटेक, बॅचलर ऑफ लॉ, बीआर्च, बीएबीएड, बीएसडब्ल्यू, बीएस्सी, बीई, अशा एकूण १३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गैरप्रकार म्हणून प्रत्यक्ष नोंद करून परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

पुढारी

# १३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. शनिवारी बी.कॉम., बी.ए., बी.टेक., बॅचलर ऑफ लॉ, बी. आर्किटेक्चर, बीएसडब्ल्यू, बी.ई., बी.व्होक आदी १३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.